**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिल दामोधर माळी
मु.पो.ता.मोहोळ, नागनाथ गल्ली,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
मोहोळ, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३५/२०१०/सोलापूर |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुनिल दामोधर माळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिका-यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शिवशंकर विश्वनाथ घोलप
मु.महागांव, पो.बावी,
ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
धर्मादाय आयुक्त कार्यालय,
औषधी भवन, उस्मानाबाद

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
नाईक चॅरिटेबल ट्रस्ट, जूना बस डेपो,
गणेश नगर, जि.उस्मानाबाद,

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०३५/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८/०४/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१/०५/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०/०६/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ज्ञानदिप माध्यमिक आश्रमशाळा तांबेवाडी तांडा, वसंतराव नाईक मागास समाज मंडळ उस्मानाबाद व श्री नाईक चॅरिटेबल ट्रस्ट इ. संस्थांच्या संबंधातील एकूण १७ मुद्दयांची विस्तृत माहिती | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. शिवशंकर विश्वनाथ घोलप यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी दिलेल्या निर्णयातही त्याबाबतची पुष्टी होत नाही. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संतोश नवलू भातकर
स.नं.१०, चित्रा चौक, जे.जे.चेंबर्स समोर, येरवडा, पुणे-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्या., येरवडा विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्या., येरवडा विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्या., येरवडा विभाग, पुणे श्री.एस.एल.गणेशकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्या., येरवडा विभाग, पुणे श्री.इ.व्ही.मामीलवाड

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.४.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.४.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.५.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.६.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

विजेची तार अंगावर पडून आपले वडील मृत्यू पावले. आपण शारीरीकदृष्ट्या अपंग व आजारी असल्यामुळे कोणतेही काम करू शकत नसल्यामुळे बेरोजगार आहोत. सन १९९६ पासून हा विषय आपण महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडे मांडत असूनही नुकसानभरपाई व त्या संदर्भातील माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संतोष नवलु भातकर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती देण्यात आली. कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी संबंधित विषयातील नुकसानभरपाईबाबतची कार्यवाही करता आलेली नव्हती, हेही अपीलकर्त्यास वेळोवेळी स्पष्ट केले. दरम्यान दि.१७.२.२००९ रोजी नुकसानभरपाईही देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., येरवडा विभाग, पुणे श्री.इ.व्ही.मामीलवाड व अपिलीय प्राधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., येरवडा विभाग, पुणे श्री.एस.एल.गणेशकर यांनी धनादेशाचा क्रमांक आदी तपशिलासह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. मल्लया सिध्दय्या मठपती
मु.संगोगी (ब.),
पो.मैंदर्गी, ता.अक्कलकोट,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
अक्कलकोट, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४६/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/०१/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६/०३/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३/०४/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. मल्लया सिध्दय्या मठपती यांच्या दोन मुलांचे 'जंगम' या जातीचे दाखले मिळणेबाबत | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. मल्लया सिध्दय्या मठपती हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्याने माहिती -मागणी अर्जान्वये जातींचे दाखले

मिळणेबाबत मागणी केली होती, सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, तरी देखील अपीलकर्त्यास जात पडताळणी अधिनियमानुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत दि.२३/०७/२००७ व ८/०६/२००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि अपीलकर्त्याने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे अपीलकर्त्याचा जातीचा दाखला मागणी अर्ज निकाली काढण्यात येऊन त्याबाबत कळविण्यात आले आहे', असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट श्री.आर. ए. मुल्ला यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. भागवत नागनाथ गायकवाड
मु.पो.देगांव, ता.उत्तर सोलापूर,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
भूमि अभिलेख सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
भूमि अभिलेख उत्तर सोलापूर,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४८/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/०३/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४/०५/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०/०५/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दिनांक १२/१२/२००७ रोजी आयोजित केलेल्या मोजणीस अडथळा आणून मोजणी रद्द करण्यास भाग पाडणाऱ्या इसमावर कारवाई करण्याबाबत | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. भागवत नागनाथ गायकवाड यांनी दि.१२/१२/२००७ रोजी आयोजित केलेली मोजणी रद्द व्हावी यासाठी भ्रमणध्वनीवरुन

मोजणीस येऊ नये, असा संदेश देणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्याची मागणी केली असून सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही', असे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. बी. व्ही. रेड्डी व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, श्री. ज. व. निकम यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. ते रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. घननीळ नामदेव भोसले
रा.कुमठानाका, श्रीरामनगर, प्लॉट नं.७,
यशंवत हौ.सोसायटी लगत, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी,**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५८/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५/०३/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३/०४/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३/०५/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३/०६/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** यशवंत नगर (बी.) मधील प्लॉट नं. २८ अ, याजागी बांधकाम करण्यास दिलेल्या परवानगीच्या संदर्भातील माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. घननीळ नामदेव भोसले हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्यास रु.१३५/- भरणा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत दि.२३/४/२००५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि अपीलकर्त्याने पैसे भरले

नसल्याने त्यांना माहिती देण्यात आली नसल्याचे' जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, श्री.सु. ब. सावसकर व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी, सोलापूर महानगरपालिका, श्री.अ. स. विपत यांनी प्रपत्रात व त्यासोबतच्या लेखी निवेदनामध्ये नमूद केले आहे. अपीलकर्त्याने माहिती आवश्यक तर शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रामगोंडा चनबसप्पा बिराजदार
मु.पो.औराद, ता.दक्षिण सोलापूर,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक,**
सहकारी संस्था, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि.,
२०५, पूर्व मंगळवार पेठ,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५९/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९/१२/२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५/०३/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५/०४/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** भूमापन क्र.१०२७/१+२ क धारणप्रकार, मजरेवाडी या मालमत्तेच्या लिलावाच्या कामकाजाच्या कागदपत्रांच्या सत्यप्रती | |

**विवेचन**

नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ. *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. मच्छिंद्रनाथ गोविंदराव जगदाळे
मु.पो. कुर्डुवाडी,
ता.माढा, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
भूमि अभिलेख,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
भूमि अभिलेख बार्शी,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७२/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे तळवडे, ता.बार्शी येथील गट नं. ५०३ व ५०४ चा नकाशा दुरुस्त करुन मिळणेबाबत | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती -मागणी अर्जानुसार वेळेत उत्तर दिलेले आहे, तसेच त्यांच्या जमिनीची रीतसर मोजणी करुन घेणेबाबत समक्ष सांगितले असून मोजणीनुसार अतिक्रमण आढळून आल्यास उपविभागीय अधिकारी अथवा दिवाणी न्यायालयात दाद मागण्याबाबत सुचविले आहे', असे जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, बार्शी श्री. का. बा. शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, सोलापूर

श्री.ज. व. निकम यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. निवेदनामध्ये प्रपत्रासोबत जोडलेल्या लेखी गट नं.५०३ चा कब्जा घ्यावा व जुना नकाशा दुरुस्त करुन मिळावा, अशी मागणी अपीलकर्त्याने केली असून सदरची बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विजय पांडुरंग सुपेकर
९३१, मेनरोड, मु.पो.व ता.करमाळा,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
सोलापूर विभाग, नाथ प्राईड,
सिव्हिल हॉस्पिटलच्या जवळ,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
समाजसेवा मित्र मंडळ,
करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७३/२०१०/सोलापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/०८/२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०/०३/२०१० |
| ४ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. विजय पांडुरंग सुपेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत केले नसल्याने सदर अपील मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. राहुल तुळशीराम झालटे
पाटील प्लॉट, शिवाजीनगर,
मु.पो. व ता.बार्शी,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७४/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७/०३/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/०४/२०१० |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सहाय्यक सल्लागार या पदासाठी पात्र झालेल्या उमेदवारांची यादी, उमेदवारांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या प्रती याबाबत १ ते ६ मुद्दयांची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. राहुल तुळशीराम झालटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दगडू दादू कोरबू
मु.पो.अकलूज, ता.माळशिरस,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७६/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२/०१/२०१० |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** गट नं. ८३ ते ८६ चा ७/१२ उतारा व फेरफार उतारा मिळणेबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. दगडू दादू कोरबू यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शरद प्रकाश दंदाडे
१९७ ब, रामबाग, जुनीपेठ,
पंढरपूर, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन),**
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपरिषद पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०७७/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८/१२/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/०१/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४/०२/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७/०५/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९९८-९९ या कालावधीत नियुक्त करण्यात आलेल्या सफाई कामगारांची संख्या, सदर कर्मचाऱ्यांनी नोकरी मागणी अर्ज पाच वर्षापूर्वी दाखल केला होता काय, असल्यास त्याची रजिस्टर नोंद व टिपणी अहवालाची प्रत, श्रीमती विठाबाई दंदाडे यांचा दि.१६/०९/९९ चा अर्ज नाकारण्याची कारणे | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. शरद प्रकाश दंदाडे यांना अभिलेखात उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे मुदतीत दिलेली आहेत. अपीलकर्त्याची आयोगाकडील

अपिलातील मागणी ही श्रीमती दंदाडे यांच्या नियुक्तीचे आदेश मिळावेत व त्यांना नुकसान भरपाई मिळावी, ही असून सदरची बाब ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही', असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर, श्री. मंगेश चितळे व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार श्री.अ.दे.वेणगुलकर यांनी प्रपत्रात नमूद केले आहे, ते रास्त आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

कुमारी एस.आर.डोईफोडे
ब्लॉक नं.२४, विश्राम सोसायटी,
भगतसिंग मार्केट जवळ, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,**
आरोग्य सेवा, पुणे मंडळ,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे मंडळ यांचे कार्यालय,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१/०४/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६/०५/२००८५ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७/०६/२००७ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मे, २००७ मध्ये करण्यात आलेल्या 'क' व 'ड' संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्यांच्या अनुषंगाने एकूण ५ मुद्दे | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्त्या कुमारी एस.आर.डोईफोडे या अनुपस्थित होत्या. अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती - मागणी अर्जानुसार मुदतीत

उत्तर दिले असल्याचे', सहाय्यक जन माहिती अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ कार्यालय, श्री. टी. के. कुमावनी व अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, यांचे प्रतिनिधी डॉ. के. एम. देशपांडे यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्यांच्या मागणीतील मुद्दा क्र.४ व ५ हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहितीच्या' व्याख्येत अंतर्भूत होत नाहीत.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 28 APR 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

डॉ.विलास भगवान पाटील
ममता हॉस्पिटल, कुर्डुवाडी रोड,
बार्शी, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता,**
महात्मा गांधी मेमोरियल मेडिकल कॉलेज,
औरंगाबाद

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक,**
बार्शी मॅटर्निटी ॲण्ड को-ऑप. हॉस्पिटल
(सध्याचे डॉ. हिरेमठ को-ऑप. हॉस्पिटल) बार्शी,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८३/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/०५/२००८ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** डॉ एस.आर.देशपांडे यांचा वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापनाचा कालावधी व अनुभवाबाबतची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१९/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता डॉ. विलास भगवान पाटील हे अनुपस्थित होते. डॉ. हिरेमठ को-ऑप. हॉस्पिटल, बार्शी (पूर्वीचे बार्शी मॅटर्निटी ॲण्ड को - ऑप. हॉस्पिटल) या संस्थेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष आर्थिक सहाय्य मिळत नाही, त्यामुळे सदर संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी

लागू होत नाहीत, असे निवेदन, तसेच याबाबतच्या सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी यांच्या दि.१९/०७/२००६ च्या पत्राची प्रत अध्यक्ष, डॉ. हिरेमठ को-ऑप. हॉस्पिटल, बार्शी व प्रशासकीय अधिकारी, डॉ. हिरेमठ को-ऑप हॉस्पिटल, बार्शी यांनी प्रपत्रासोबत जोडले आहे. सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र. ३६४८ /२००७ प्रकरणी दिलेला आहे. हा निर्णय व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 28 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रघुनाथ मकडू लोहार
प्लॉट नं.१५४, सेक्टर१९,
कोयनानगर, चिंचवड,
पुणे-१९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता,**
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (उद्यान-स्थापत्य),**
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९३/२०१०/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. रघुनाथ मकडू लोहार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे.
दि :- 30 APR 2010